## न्या य नि र्ण य

(दिनांक ०६ मे, २०२४ रोजी घोषीत)

सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीच्या वकीलांचा युक्तिवाद व पुराव्यावरुन खालील मुद्दे विवेचनार्थ उपस्थित झाले व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दिनांक १५/१२/२०१९ रोजी दुपारी १२.३० वाजता रवंजे बु., ता.एरंडोल येथे आरोपी घराच्या आडोश्याला चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने रु.१०६९०/– किंमतीची देशी विदेशी दारु स्वतःच्या कब्जात विना परवानगी गैरकायदा बाळगताना मिळून आल्याचे अभियोग पक्ष शाबीत करतो काय ? | ... नाही. |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

**वादप्रश्न क्र.१ करिताः–**

२. आरोपीविरुध्द दोषारोप शाबीत करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे एकूण दोन साक्षीदार तपासण्यात आले. अभियोग पक्षातर्फे पोशि सचिन महाजन (अ.सा.क्र.०२) यांना फिर्यादी म्हणुन, पोना जुबेर खाटीक (अ.सा.क्र.०१) यांना तपास अधिकारी म्हणून तपासण्यात आले. पोशि सचिन महाजन (अ.सा.क्र.०२) यांनी कथन केले की, दिनांक १५/१२/२०१९ रोजी दुपारी १२.३० वाजता रवंजे बु., ता.एरंडोल येथे आरोपी घराच्या आडोश्याला चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने रु.१०६९०/–किंमतीची देशी विदेशी दारु बाळगतांना मिळून आला. प्रत्येक प्रकारची एक बाटली नमुना काढुन सविस्तर पंचनामा पोना राहुल बैसाणे यांनी केला. पोशि सचिन महाजन (अ.सा.क्र.०२) यांनी पोलीस ठाण्यात जावुन त्यांनी शासनाच्या वतीने नि.क्र.१४ कडील फिर्याद दाखल केली. त्यांनी त्यांच्या उलटतपासात कथन केले की, घटनास्थळावरील घर क्रमांक सांगता येणार नाही. आम्हाला माहिती मिळाल्यानंतर ती माहिती आम्ही एरंडोल पोलीस स्टेशनला दिली नाही. एरंडोल येथिल स्थानिक पोलीस कर्मचारी मदतनीस म्हणुन घेतले नाही. जप्त बाटल्यांचे बॅच नंबर, निर्मीती तारीख व एक्सपायरी डेट मी सांगु शकत नाही. जप्त बाटल्यांमधिल दारु काढुन नमुना घेतलेला नाही. पंचांना पोना राहुल बैसाणे हे ओळखत होते म्हणुन त्यांनी त्यांना पंच म्हणुन बोलाविले.

३. पोना जुबेर खाटीक (अ.सा.क्र.०१) यांनी कथन केले की, दिनांक १५.१२.२०१९ रोजी मी

एरंडोल पोलिस ठाण्यात कार्यरत होतो. त्या दिवशी मी पोलीस ठाण्यात हजर असतांना स्थानिक गुन्हे शाखा पथकाने रवंजे बु. गावी छापा टाकुन देशी व विदेशी दारु पकडली होती. पोशि सचिन महाजन यांनी फिर्याद दाखल केली होती. त्याप्रमाणे दाखल गुन्ह्याचा पुढील तपास माझ्याकडे देण्यात आला. माझ्या ताब्यात फिर्याद, प्रथम खबरी अहवाल व पंचनामा तसेच टँगो पंच दारुच्या १८० मिलीच्या ६७ बाटल्या, कॅनॉन बियरच्या, इम्पीरीयल ब्ल्यु, मॅक्डॉल व्हीस्की, ओफिसर चॉईस या विदेशी दारुच्या बाटल्या देण्यात आल्या. साक्षीदारांचे जबाब त्यांचे सांगणेप्रमाणे नोंदविले. त्यांनी निशाणी १० कडील मुद्देमाल पावती तयार केली. निशाणी ११ कडील समजपत्र देवुन आरोपीला सोडुन दिले. त्यांनी साक्षीदारांचे जबाब त्यांचे सांगणेप्रमाणे नोंदविले. नि.१२ कडील स्थळप्रती प्रमाणे नमुना तपासणीकामी पाठविला. नि.१३ कडील नमुना तपासणी अहवाल प्राप्त झाला. पुरावा गोळा झाल्याने त्यांनी आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. त्यांनी त्यांच्या उलटतपासात कथन केले की, स्थानिकांचे जबाब नोंदविले नाही. घटनास्थळावरील घर क्रमांक सांगता येणार नाही. घटनास्थळाची चतुःसिमा मला सांगता येणार नाही. केवळ पोलीस कर्मचाऱ्यांचे जबाब नोंदविले.

५. अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षीदारांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, पोशि सचिन महाजन (अ.सा.क्र.०२) यांच्या पुराव्यातून फिर्याद तर पोना जुबेर खाटीक (अ.सा.क्र.०१) यांच्या पुराव्यातून समजपत्र, मुद्देमाल पावती, नमुना तपासणीकामी पाठविल्याचे पत्र व नमुना तपासणी अहवाल शाबीत झाला. परंतु नमुना वाहकाची साक्ष न नोंदविल्याने तसेच पंचनामा शाबित न झाल्याने आरोपीच्या ताब्यातुन निषिध्द मुददेमाल मिळून आल्याबाबत संशय निर्माण होतो. आरोपी निषिध्द मुद्देमाल ग्राहकांना विक्री करत असल्याबाबत अभियोग पक्षाच्या साक्षीदारांनी त्यांच्या तोंडी पुराव्यात कथन केलेले नाही. किंबहूना बेकायदेशिर दारु विक्री करताना आरोपीस पकडले असे तोंडी पुराव्यातून शाबीत होत नाही. छापा कारवाईवेळी तोतया ग्राहकाद्वारे खरोखर बेकायदेशिर दारु विक्री केली जात होती का? याची शहानिशा देखील करण्यात आलेली नाही.

५. त्याचप्रमाणे दोषारोपपत्रात तसेच निशाणी १४ कडील फिर्याद मध्ये छापा कारवाई दिनांक १५/१२/२०१९ रोजी केल्याचे नमुद असले तरी नि.क्र.१३ कडील सी. ए. अहवालावर नमुना दिनांक ०८/०२/२०२२ रोजी जमा केल्याचे नमुद केले आहे. यावरुन नमुना हा तब्बल ७८५ दिवस पोलीस ठाण्यात पडुन राहिल्याचे दिसुन येते. त्याबाबत कोणतेही स्पष्टीकरण अभियोगपक्षातर्फे देण्यात आलेले नाहीत. नमुना तपासणीकामी पाठविण्यात आल्याचे पत्र शाबित झाले नाही. त्यामुळे रासायनिक परिक्षण अहवाल प्रस्तुत आरोपीकडून जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भातीलच आहे, असा निष्कर्ष वाजवी संशयापलिकडे जाउन काढता येत नाही. त्यामुळे वर नमुद त्रुटींकरिता आरोपीविरुध्दचा दोषारोप वाजवी संशयापलिकडे शाबीत झालेले नाहीत. आरोपीला नियमाप्रमाणे संशयाचा फायदा मिळत असल्याने मी वादप्रश्न क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**वादप्रश्न क्र.२ करिताः–**

६. अभियोगपक्ष आरोपीविरुध्दचा दोषारोप संशयापलीकडे जाउन सिध्द करु शकला नाही. त्यामुळे आरोपी निश्चितपणे निर्दोष सुटका होण्यास पात्र होत आहे. म्हणुन वादप्रश्न क्र.२ चा निष्कर्ष नोंदवितांना मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे–

**आ दे श**

| | |
|---|---|
| १ | आरोपी आकाश सुरेश कोळी यास महा. दारुबंदी अधिनियम कलम ६५ ई नुसार शिक्षेस पात्र असणा–या गुन्हयातुन फौ. प्र. सं. क. २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २ | आरोपीचा जामीन कदबा रद्द करण्यात येत असून त्यास नमुद गुन्हयातुन मुक्त करण्यात येत आहे. |
| ३ | आरोपीने फौजदारी पक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे द्यावयाचा रक्कम रुपये १५,०००/– चा जामीन कदबा आज पासून पुढील ६ महिन्यांकरीता अस्तित्वात राहील. |
| ४ | अपिलकालावधी संपल्यानंतर गुन्ह्यातील जप्त दारुची नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्याकरीता सदरचा मुद्देमाल मा.अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, जळगांव यांच्याकडे पाठविण्यात यावा. |

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित)**

Digitally signed by DHONDAGE VISHAL SHRAVAN
Date: 2024.05.07 17:24:43 +0530

दिनांकः ०६/०५/२०२४
ठिकाणः एरंडोल

**(विशाल श्रावण धोंडगे)**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी

निकाल सांगितल्याचा दिनांक : ०६/०५/२०२४
निकाल टंकलिखीत केल्याचा दिनांक : ०६/०५/२०२४
निकालावर सही केल्याचा दिनांक : ०६/०५/२०२४